कायम विना अनुदानित तत्वावर

(मराठी, इंग्रजी ,हिंदी ,उर्दू ,तामिळ इत्यादी माध्यम)

पुणे जिल्हा परिषद,पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग (प्राथमिक) 696
जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ./खाप्राशा//2019
पुणे1दिनांक-/3/2019
5/4/2019

प्रति,

अध्यक्ष/सचिव/मुख्याध्यापक,

सिहगड टेक्नीकल एज्युकेशन सोसायटी संचालित सिहगड सिटी स्कूल कोंढवा ,ता.हवेली,जि.पुणे

विषय:-बालकांच्या मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम,2009 यांच्या कलम 18 च्या प्रयोजनार्थ, बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम,2011याचा नियम11,पोट नियम(4) अन्वये शाळांना मान्यता प्रमाणपत्र देणे बाबत.

आपल्या अर्जाच्या संदर्भात आणि त्यानंतर या संदर्भात शाळांशी केलेला पत्रव्यवहार /शाळेची केलेली तपासणी याआधारे.मी. शिक्षणाधिकारी (प्राथमिक),पुणे जिल्हा परिषद, पुणे दिनांक1 एप्रिल 2016 पासून ते दिनांक 31 मार्च 2019 पर्यंतच्या कालावधीसाठी इ.1 ली ते इ.8 वी सिहगड टेक्नीकल एज्युकेशन सोसायटी संचालित सिहगड सिटी स्कूल कोंढवा ,ता.हवेली,जि.पुणे,तातपुरतीमान्यतादेतआहे.वरील मान्यत्ताही खालील शर्तीच्या पूर्ततेच्या अधीन आहे.मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ताआठवी नंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणतेही बंधन नसेल.

1.बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम 2009 (जोडपत्रएक) आणि महाराष्ट्र बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या हक्कनियम 2011 (जोडपत्रदोन) शाळा पालन करील.

2.शाळांना नजिकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना पहिल्या इयत्तेत त्या इयत्तेतील विद्यार्थी संख्येच्या किमान 25% मर्यादे पर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की, पूर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीत देखील याप्रमाणेअनुपालन करण्यात येईल.

3.परिच्छेद 3 मध्ये निर्दिष्ट केलेल्या बालकांकरिता शाळेला अधिनियमाच्या कलम12 (2) नुसार प्रतिपूर्ती मिळेल.अशी प्रतिपूर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बॅंकखाते देण्यात येईल

4. संस्था/शाळा कोणतेही कॅपिटेशन फी वसूल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकास किंवा त्यांच्या किंवा त्याच्या मात्या-पित्यास किंवा पालकास भाग पाडणार नाही.

5. कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी,धर्म,जात,किंवावंश,जन्मठिकाण किंवा यापैकी कोणत्याही कारणास्तव,शाळेमध्ये प्रवेश नाकारता येणार नाही.

6 (एक) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेतअसेल त्याच इयत्तेत रोखून ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेतून काढून टाकण्यात येणार नाही.

7 (दोन) कोणत्याही बालकास शारीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.

(तीन) कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाची परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.

(चार) प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या बालकास नियम 23 अन्वये निर्धारित केलेले प्रमाणपत्र देणेत येईल.

(पाच) विकलांग/विशेषगरजा असलेल्या विद्यार्थ्यांचा अधिनियमाच्या तरतुदींनुसार समावेश करणेत येईल.

(सहा)अधिनियमाच्या कलम 23(1) मध्ये अन्वये निर्धारित केलेली किमान अर्हता धारण करणाऱ्या शिक्षकांच्या नियुक्ती करण्यात येईल. परंतु आणखी असेकी, अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धारण न करणाऱ्या शिक्षकांना अशी किमान अर्हता 5 वर्षाच्या कालावधीत संपादित करावी लागेल.

(सात) अधिनियमाच्या कलम 24(1) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्यांची/तिची कर्तव्य शिक्षक पार पाडतील आणि

(आठ) शिक्षकाने/शिक्षिकेने खाजगी शिकवणीच्या कामात स्वतःला गुंतवून घेऊ नये, याची सुनिश्चिती शाळा करे

Headmistress
Sinhgad City School
Kondhwa(Bk.), Pune-48.

शाळा समुचित प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमाच्या आधारे तयार केलेल्या पाठ्यक्रमाचे पालन करील. शाळा,अधिनियमाच्या कलम 19 मध्ये विहीत केल्या प्रमाणे नशाळेत उपलब्धअसलेल्या सुविधांच्या प्रमाणात विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.

शाळा अधिनियमाच्या कलम 19 मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील. मागील तपासणीच्या वेळेत शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधा खालील प्रमाणे होत्या:

- शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ:- 12299 चौ मी
- एकूण बांधकामा चे क्षेत्रफळ:- 6237.18 चौ मी
- खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ:- 3451.87 चौ मी
- वर्ग खोल्यांची संख्या.:- 32
- कार्यालय- नि-भांडार- नि-मुख्याध्यापकाची खोली.:- 3
- मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधनगृह आहेतकाय?:-

| | | मुले | मुली |
|---|---|---|---|
| संडास | ---- | 24 | 18 |
| मुताऱ्या | ---- | 48 | 18 |

- पिण्याच्या पाण्याची सुविधा आहे.
- दुपारचे जेवण शिजवण्यासाठी स्वयंपाकघर. :-लागूनाही.
- अध्यापन अध्ययन साहित्य/खेळ व क्रिडाविषयक सामग्री / ग्रंथालयांची उपलब्धता.:-आहे

वाचन साहित्य विनासायास उपलब्ध.:-आहे.(ग्रंथालय पुस्तकसंख्या- 3994 नियतकालिक/वर्तमानपत्र: 2 )

मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकड्या,शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र चालविला जाणार नाहीत.

8.शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रीडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्यविकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.

9.शाळा सोसायटी नोंदणी नियम 1860 (1860 चा 21) किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम 1950 अन्वये नोंदणी झालेल्या संस्थे मार्फत चालविण्यात येत आहे.

10.शाळा कोणत्याही व्यक्तीच्या, गटाच्या किंवा व्यक्ती संघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायद्या करिता किंवा कोणताही नफा मिळविण्यासाठी चालविण्यात येत नाही.

11. शाळेचे लेखे सनदी लेखापाला कडुन लेखा परिक्षित व प्रमाणित करुन घ्यावेत आणि नियमांनुसार योग्य लेखा विवरण पत्रे तयार करावीत. प्रत्येक लेखा विवरण पत्राची एक प्रत दर वर्षी जिल्हा शिक्षणाधिकाऱ्यां कडे पाठवण्यात यावी.

12.तुमच्या शाळेला मिळालेला मान्यता सांकेतांक प्राथ./ कावि/अशाळा/हवेली / असा आहे तसेच आपल्या शाळेचा U-DISE No. 27251700611 हा आहे. या कार्यालयाशी कोणताही पत्र व्यवहार करताना कृपया तो नमूद करावायाची नोंद घ्यावी.

13.मा. शिक्षणसंचालक/जिल्हा शिक्षणाधिकारी वेळो वेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निरंतर पूर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रुटी दूर करण्यासाठीशासनकिंवास्थानिकप्राधिकारणदेईलअशासूचनांचेपालनकरावे.

14. संस्थेच्या नोंदणीचे कोणतेही असल्यास नूतनीकरण केल्याची सुनिश्चित करावी.

15. जोडपत्र तीन नुसार इतर शर्ती या सोबत जोडल्या आहेत.

Headmistress
Sinhgad City School
Kondhwa(Bk.), Pune-48.

शिक्षणाधिकारी(प्राथमिक)
पुणेजिल्हापरिषद,पुणे